(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक धोरण : एक अभ्यास

**सायली सुरेश पिलणकर,** २०४, भक्ती अपार्टमेंट, सेक्टर ४, करंजाडे, पनवेल, जि. रायगड. ४१०२०६

भ्रमणध्वनी : ९५८८४१२२८० Pilankarsayali@gmail.Com

---

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. याचे मोठे श्रेय महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कार्यरत राहिलेल्या सर्वच समाजसुधारकांचे आहे. महाराष्ट्राला समाजसुधारकांची मोठी परंपरा लाभली आहे. करवीर संस्थानचे छत्रपती, राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत मोठे योगदान आहे. बहुजनांचे शिक्षण, नोकरी-व्यवसायाच्या संधी, मल्लविद्येचा पुरस्कार, स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धाराच्या योजना, मराठी रंगभूमीच्या विकासासाठी दिलेले योगदान, सामाजिक समतेची धोरणे या सर्वांच्या बाबतीत राजर्षी शाहू महाराजांची दूरदृष्टी स्पृहणीय आणि अनुकरणीय आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य अनन्यसाधारण असेच आहे. कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजाच्या शैक्षणिक स्थितीवर अवलंबून असते. हे लक्षात आल्यामुळेच राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणविषयक योजनांना प्राधान्य दिले. तत्कालीन सामाजिक स्थिती, जातीव्यवस्था, आर्थिक स्थिती यांची समीकरणे लक्षात घेऊन त्यांनी कालपरत्वे आपण आखलेल्या धोरणांमध्येही बदल घडवून आणले. लोकनायक शाहू महाराजांनी केवळ धोरणे आखली नाहीत तर अंमलात आणून दाखवली. स्वतः त्या धोरणांना अनुसरून कृती केली. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक धोरण हे वर्तमान आणि भविष्यकाळासाठीही दिशादर्शक असेच आहे. त्यांच्या शैक्षणिक धोरणांचा आढावा घेण्याचा प्रयत्न मी या शोधनिबंधातून केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१) राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांचा आढावा घेणे

२) राजर्षी शाहू महाराजांची शिक्षणप्रसारामागील उद्दिष्टे समजून घेणे

३) राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक धोरणांमधील दूरदर्शिता अभ्यासणे

**संशोधन पद्धती :**

दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करून हा शोधनिबंध तयार करण्यात आला आहे. यासाठी उपलब्ध लिखित माहिती संदर्भ ग्रंथ, नियतकालिके तसेच वर्तमानपत्रे यांतून घेण्यात आली आहे.

**राजर्षीशाहू महाराज यांचे शैक्षणिक धोरण :**

कोल्हापूर संस्थानाची सूत्रे राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी हातात घेतली. त्या वेळेस राज्यकारभाराची दिशा स्पष्ट करणारा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता. या जाहीरनाम्याच्या माध्यमातून शाहू छत्रपतींनी एकप्रकारे आपले धोरणच स्पष्ट केले होते. ते म्हणतात, 'आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानाची हरएक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमची उत्कट इच्छा आहे.' या विधानात छत्रपती शाहूंचा आपल्या प्रजेकडे पाहण्याचा एकूणच समानतावादी दृष्टिकोण प्रत्ययास येतो. 'आमची सर्व प्रजा' या शब्दात संस्थानातील जात-पात विरहित सर्वच घटकांना कोणत्याही श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या संदर्भाशिवाय सामावून घेतले असल्याचे दिसून येते. सर्वांना भेदभावाशिवाय समान वागणूक, समान न्याय आणि समान विकासाच्या संधी मिळतील याची ग्वाही राजर्षी शाहू महाराज आरंभीच देताना दिसतात. आपली प्रजा तृप्त आणि सुखी रहावी यासाठी ते कायमच प्रयत्नशील राहिले. संस्थानातील बहुसंख्य प्रजाजन दीनवाण्या परिस्थितीत जगत होते. परंपरेने आलेली मानसिक गुलामगिरी, भाबड्या धार्मिक समजुती, अंधश्रद्धा यांमुळे मोठा वर्ग शोषणाचा बळी ठरत होता. ही बाब राजर्षी शाहू महाराजांच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नव्हती. शैक्षणिक मागासलेपण हेच बहुजनांच्या या करूण अवस्थेचे मूळ कारण आहे हे त्यांच्या लक्षात आले. या मूलभूत समस्येच्या निर्मूलनासाथिओ त्यांनी बहुजनांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा निर्धार केला. त्यासाठी तत्कालीन समाजधुरीण न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाल कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाल भांडारकर आदींशी चर्चा केली. या महान विभूतींच्या विचारमंथनातून अखेर सर्व समाजाच्या विकासाला चलन देण्यासाठी 'शिक्षण सुधार समिती' स्थापन झाली.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान 'समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्मितीसाठी शिक्षण प्रसार' हे होते. त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात विविध अभिनव शैक्षणिक धोरणे आखली. केवळ आखली नाहीत तर प्रयत्नपूर्वक ती धोरणे अमलातही आणली. शिक्षणाशिवाय समाजाला तरणोपाय नाही हे राजर्षी शाहू महाराजांचे ठाम मत होते. त्यांची शिक्षणविषयक चार सूत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) समाजात सर्वप्रथम प्राथमिक शिक्षणाची सोय निर्माण करणे, सर्वांना किमान प्राथमिक शिक्षण मिळेल याची निश्चिती करणे, त्यानंतर दुय्यम व शेवटी उच्च शिक्षणाची सोय करणे

२) समाजात प्रतिकूल परिस्थितीत जगणाऱ्या घटकांना शिक्षणाच्या सोई विशेष बाब म्हणून उपलब्ध करून देणे

३) ग्रामीण भागातून शहरात येऊन कमी खर्चात शिक्षण घेता यावे म्हणून सर्व जाती-जमातींतील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारणे

४) नवशिक्षितांच्या पहिल्या पिढीचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्यासाठी रोजगाराची सोय करणे, तसेच संस्थानातील नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवणे

संस्थानाच्या राज्यकारभारात जनतेचा सहभाग वाढावा अशी राजर्षी शाहू महाराजांची मनस्वी इच्छा होती. त्यासाठी जनतेची मानसिकता तयार केली पाहिजे आणि संस्थानात शियाक्षणिक चळवळ वृद्धिंगत केली पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले होते. 'लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर जड आणि जुलमी जूं लादले गेले आहे. ते झुगारून देण्याची शक्ती बहुजन समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरूरी आहे' याची जाणीव त्यांना सातत्याने होत होती. राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच छत्रपती नव्हते, तर ते कृतिशील समाजसुधारकही होते. त्यामुळे आपले शैक्षणिक विचार आणि सूचना मांडून ते शांत बसले नाहीत तर त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत करून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आदेश काढला. या आदेशात शिक्षणास योग्य मुलांची यादी करणे, त्यांना सक्तीने शाळेत भरती करणे तसेच शाळेत गैरहजर राहणाऱ्यांना दंड करणे या बाबी अंतर्भूत होत्या. या आदेशाची कडक अमलबजावणी होत आहे याबाबत महाराज कायम दक्ष होते. मात्र इथे ही बाब देखील लक्षात घ्यायला हवी की राजर्षी शाहू महाराजांचा कालखंड हा केवळ कृषिकेंद्रित अर्थव्यवस्थेचा कालखंड आहे. बहुसंख्य समाज हा शेती आणि शेतीवर आधारित कामे करून आपला उदरनिर्वाह करीत असे. अशावेळी घरातील मुले हीच कष्टकरी माता-पित्यांचे मनुष्यबळ होती. याही गोष्टीचा विचार शाहू महाराजांनी केला होता. त्यामुळे सक्तीच्या शिक्षण कायद्यात 'आई-वडिलांच्या निकडीच्या कामासाठी मुलांच्या मदतीची जरूरी असल्यास १५ दिवस मुलांना घरी ठेवून घेता येईल' अशी तरतूदही करण्यात आली होती.

राजर्षी शाहू महाराजांच्या या धोरणाचा अत्यंत अनुकूल परिणाम झाल्याचे दिसून येते. कारण प्राथमिक शाळांची संख्या १८९३-९४ ला १८३ इतकी होती. मात्र हीच संख्या १९२१ मध्ये ४९६ इतकी झाली होती. हेच प्रमाण विद्यार्थी संख्येच्या संदर्भात तपासायचे झाल्यास १८९३-९४ मध्ये प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ११ हजार ४२ इतकी होती तर १९२१-२२ पर्यंत विद्यार्थ्यांची संख्या २६ हजार ६२८ पर्यंत वाढली. तसेच नव्या धोरणानुसार सुरू झालेल्या सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या १९१७-१८ मध्ये २७ होती ती संख्या १९२१-२२ मध्ये ४२० एवढी झाली होती. तर विद्यार्थ्यांची संख्या ११ हजार २९६ वरून २२ हजार ७ इतकी झाली होती.

जनतेने केवळ साक्षर असून चालणार नाही तर सुशिक्षित झाले पाहिजे. शिक्षणाने जीवनाकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोण विकसित झाला पाहिजे. हा राजर्षी शाहू महाराजांचा विचार होता. ते म्हणतात, 'हल्लीच्या स्थितीत आमचे ध्येय साध्य करण्यासाठी जे कर्तव्य आम्हाला करावयाचे आहे ते आमचा समाज सुशिक्षित करणे होय. निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्याची पद्धत मी काळजीने अनुसरत आहे आणि माझ्या आयुष्याच्या पुढील कळत तीच पद्धत सुरू ठेवण्याची माझी इच्छा आहे.प्राथमिक शिक्षणावर माझ्या भर आहे. तरी दुय्यम आणि उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी नाही. माझे संस्थान सातारा आणि बेळगाव या जिल्ह्यांपेक्षा लहान असतानाही आमच्याकडे सात हायस्कूल चालू आहेत आणि दोन लौकरच सुरू होतील. शिवाय विद्यापीठाचे पुरे शिक्षण देणारे एक कॉलेजही आहे.'

चांगले विद्यार्थी घडण्यासाठी शिक्षकही गुणवत्तापूर्ण असाल पाहिजे याबाबत राजर्षी शाहू महाराज दक्ष होते. यासाठी त्यांनी शिक्षक प्रशिक्षण आणि शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन या योजना सुरू केल्या. शिक्षक प्रशिक्षणासाठी ६ महिने मुदतीचे वर्ग सुरू करण्यात आले. प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या शिक्षकांना ६ महिने निमपगारी रजा देण्याची तरतूदही करण्यात आली होती. शिक्षकांमध्ये गुणवत्ता वाढविण्यासाठी तळमळ असेल तरच तो चांगला शिक्षक बनेल. जे शिक्षक असा प्रयत्न करतील त्यांना मेरीट प्रमोशन योजना लागू करण्याचे धोरण राजर्षी शाहू महाराजांनी जाहीर केले होते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मराठी मुलकी परीक्षा देण्याकरिता शिक्षकांना तीन महिन्यांची विशेष रजाही देण्यात येत असे.

राजर्षी शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक आणि उच्च शिक्षण मिळाले पाहिजे अशी भूमिका घेतली. खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात येणे भाग होते. मात्र त्यांची राहण्याची सोय नसल्याने असे बहुसंख्य विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत होते. या प्रश्नाची सोडवणूक व्हावी म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेतला. मात्र तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणावर सामाजिक विषमता होती, जातिभेद मानले जात होते. वसतिगृहात विविध जातीतील विद्यार्थ्यांना एकत्र प्रवेश दिला गेला तर येथे श्रेष्ठ-कनिष्ठतेचा संघर्ष उभा राहून अभ्यासाकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांनी वेगवेगळ्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे बांधली. यांमध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, जैन बोर्डिंग, मिस क्लर्क हॉस्टेल, दयानंद हॉस्टेल, सारस्वत बोर्डिंग, कायस्थ प्रभू बोर्डिंग, पांचाल

ब्राह्मण हॉस्टेल, वैश्य बोर्डिंग, देवांग बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, मोहरी समाज बोर्डिंग, वैदिक स्कूल हॉस्टेल, आर्य समाज गुरुकुल, प्रिन्स शिवाजी बोर्डिंग, जीनगर हॉस्टेल इत्यादींचा समावेश होता.

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य मुलांसाठीही स्वतंत्र शाळांची निर्मिती केली. शिक्षणप्रसारातून सामाजिक विषमता नष्ट व्हावी ही त्यांची दृष्टी होती. मात्र स्वतंत्र शाळांच्या माध्यमातून हे घडणार नाही हे त्यांच्या लौकरच लक्षात आले व त्यांनी स्वतंत्र शाळा बंद करून अस्पृश्य विद्यार्थ्यांनाही सरकारी शाळेत अन्य सवर्ण विद्यार्थ्यांसमवेत दाखल करून घेण्याचा आदेश काढला. सरकारी शाळेत अस्पृश्य विद्यार्थ्यांना अपमानास्पद वागणूक मिळणार नाही याबाबतही ते दक्ष होते. सरकारी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अस्पृश्य विद्यार्थ्यांना समतेची वागणूक देण्याच्या आणि त्यांच्याशी आदराने वागण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यात कसूर करणाऱ्यास शिक्षेचीही तरतूद करण्यात आली होती. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांच्यासाठी शिष्यवृत्ती देण्याचे धोरणही त्यांनी अवलंबिले होते. याशिवाय जयसिंगराव घाटगे टेक्निकल इंस्टिट्यूट, इंडस्ट्रीयल स्कूल ऑफ जिनगर्स या औद्योगिक संस्था आणि शिवाजी क्षेत्रीय वैदिक स्कूल, सत्यशोधक समाज शाळा, सरदार स्कूल, संस्कृत पाठशाळा, डोंगर शाळा, उर्दू शाळा, अरेबिक शाळा, देवल क्लब, स्काऊट इत्यादी स्वरूपाच्या शैक्षणिक संस्थांनाही त्यांनी राजाश्रय दिला होता. या व्यतिरिक्त तरबई मराठा बॉईज हॉस्टेल (पुणे), उधोजीराव मराठा हॉस्टेल (नाशिक), डिप्रेस्ड क्लास बोर्डिंग (नाशिक), मराठा विद्या प्रसारक मंडळ (पंढरपूर), शिवाजी फोर्थ स्टुडंट्स हॉस्टेल (अहमदनगर), डिप्रेस्ड क्लास बोर्डिंग (नागपूर), शिवाजी सोसायटी (पुणे), शिवाजी एज्युकेशन सोसायटी (अमरावती) इत्यादी शैक्षणिक संस्थांनाही भरघोस आर्थिक सहाय्य केले होते.

विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या या शैक्षणिक धोरणांच्या पलीकडे राजर्षी शाहू महाराजांनी राबवलेला एक अनोखा उपक्रम म्हणजे पाटील शाळा. खेडेगाव हा करवीर संस्थानाचा महत्त्वाचा घटक होता. खेड्यांचा कारभार पाटील- तलाठी यांच्या माध्यमातून चालवला जात असे. ग्रामीण भागातील रयतेचा त्यांच्याशी दैनंदिन संपर्क येत असे. त्यांच्या कार्यक्षमतेवर ग्रामीण भागाचा विकास अवलंबून होता. त्यामुळे गावागाड्याशी संबंधित विविध घटकांचे ज्ञान आणि त्यासंबंधी करावयाची कामे, काम करण्याच्या पद्धती लक्षात याव्या यासाठी पाटील शाळा सुरू करण्यात आल्या. त्याच्या जोडीनेच तलाठी वर्ग सुरू करून त्यांमध्ये गावाच्या प्रशासनाशी संबंधित विषयांचा समावेश केला. या परीक्षा पास होणाऱ्यासच कामावर रुजू करून घेतले जाईल असा आदेश देण्यात आला होता.

**निष्कर्ष** :

१) राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या सर्व स्तरातील रयतेला सामावून घेता येईल अशाप्रकारची शैक्षणिक धोरणे आखली.

२) राजर्षी शाहू महाराजांनी समाजात असलेली विषमता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा यांचे बारकाईने निरीक्षण केले होते. ही परिस्थिती बदलायची असेल तर लोकांना शिक्षित करणे गरजेचे होते. विषमता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा यांचे निर्मूलन करून समतेची स्थापना करणे हे राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षणप्रसारामागील उद्दिष्ट होते.

३) राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानातील वेगवेगळ्या जातीतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची, वसतिगृहांची सोय केली. मात्र त्यांच्यात अंतर्गत संघर्ष उभा राहू नये याचीही काळजी घेतली. विद्यार्थ्यांचे शिक्षणावरील लक्ष विचलित होईल अशा कारणांना दूर केले. केवळ शिक्षण देऊन चालणार नाही तर पुढच्या पिढीलाही शिक्षणाची ओढ लागावी म्हणून नवशिक्षितांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. पाटील आणि तलाठी यांच्या प्रशिक्षणाची तरतूद केली. त्यांना प्रोत्साहनपर भत्ता देऊ केला. काळाचा संदर्भ पाहता त्यांनी आखलेली धोरणे अत्यंत दूरदर्शी होती.

**समारोप :**

अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे एक थोर समाजसुधारक आणि शिक्षणतज्ञ होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून रयतेच्या हितासाठी धोरणे राबवली. छत्रपती असूनही ते संस्थानातील रयतेमध्ये वावरत होते. आजूबाजूच्या समाजिक, आर्थिक परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करीत होते. समाजाला नेमक्या कोणत्या सुधारणांची गरज आहे, त्या कशा पद्धतीने घडवून आणल्या पाहिजेत, सर्वसमावेशक बाबी कोणत्या असाव्यात, कोणत्या बाबी स्वतंत्रपणे हाताळल्या पाहिजेत यांचा त्यांनी नीट अभ्यास करून आपली धोरणे आखली आणि कृतीशीलपणे ती कौशल्याने राबवली. त्यांच्या दूरदर्शीपणामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीतील त्यांचे योगदान वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

**संदर्भ** :

१) डॉ. विलास संगवे – राजर्षी शाहू महाराज : कार्य व प्रभाव

२) डॉ. नारायण कांबळे – राजर्षी शाहू : नव्या दिशा, नवे चिंतन

३) डॉ. धनंजय कीर – राजर्षी शाहू छत्रपती

४) लोकराज्य (सप्टेंबर २०१८)